बंद पडलेल्या ग्रामीण प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजनांचे पुनरुज्जीवन करण्यासंदर्भात..

---

**महाराष्ट्र शासन**
पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग
शासन निर्णय क्रमांक ग्रापायो-११११/प्र.क्र.००७(ब)/पापु-०७
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२ दिनांक : १६ जुलै, २०१२

वाचा : (१) शासन निर्णय,पापुवस्ववि, क्र.ग्रापायो-११०९/प्र.क्र.१०४(अ)/ पापु०७, दि.१७ मार्च,२०१०
(२) शासन शुद्धिपत्रक क्र.ग्रापायो-११०९/ प्र.क्र.१०४ (अ)/ पापु-०७ ,दि.३१ जानेवारी, २०११

**प्रस्तावना:**

भारतीय राज्य घटनेच्या ७३ व्या घटना दुरुस्तीनंतर, राज्यघटनेच्या ११ व्या अनुसुचीनुसार पिण्याचा पाणी पुरवठा हा विषय संपूर्णपणे पंचायत राज संस्थांच्या अधिकार क्षेत्रात आल्यानंतर, राज्य शासनाने अधिकाधिक अधिकार व जबाबदारी पंचायत राज संस्थांकडे देण्याच्या ज्या पुरोगामी धोरणाचा अवलंब केलेला आहे, त्या धोरणाचा एक भाग म्हणून, ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रम राज्यामध्ये मागणी आधारित समूह सहभागाच्या लोकाभिमुख धोरणानुसार राबविण्यात येतो. त्याअनुषंगाने पिण्याच्या पाणी पुरवठ्याचे जास्तीत जास्त अधिकार ग्रामस्तरावर देण्यात आलेले आहेत. त्यानुसार ग्रामीण पाणी पुरवठा योजनांची मागणी, आखणी, अंमलबजावणी व देखभाल दुरुस्ती करण्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांवर सोपविण्यात आलेली आहे.

राज्यात एकूण मंजूर १०१२ ग्रामीण प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजनांपैकी ७५६ योजना पूर्ण झाल्या असून त्यापैकी, ५५९ योजना कार्यान्वित आहेत. तर, १९७ योजना विविध कारणांमुळे बंद आहेत. योजनेची प्रभावी देखभाल व दुरुस्ती न होणे, स्त्रोत अपुरे ठरणे, त्यातील समाविष्ठ गावांना पर्यायी स्रोतातून पाणी पुरवठा होत असल्याने योजना बंद होणे, योजना हस्तांतरीत न झाल्याने देखभाल न होणे, तसेच मोठ्या दुरुस्तीची आवश्यकता असल्याने या प्रादेशिक योजना बंद अवस्थेत आहेत. बंद असलेल्या या प्रादेशिक योजनांची देखभाल दुरुस्ती करणे संबंधित गावांच्या संयुक्त समितीला, जिल्हा परिषदांना किंवा महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास निधी अभावी शक्य होत नाही, अशी परिस्थिती आहे.

त्यामुळे, विविध कारणांमुळे बंद असलेल्या ग्रामीण प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजना पुनरुज्जीवित करण्याची आवश्यकता विचारात घेता, बंद पडलेल्या ग्रामीण प्रादेशिक नळ पाणी योजनांच्या पुनरुज्जीवनासाठी योजना सुरु करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:**

उपरोक्त वस्तुस्थिती विचारात घेऊन, राज्यातील बंद पडलेल्या ग्रामीण प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजनांसाठी पुनरुज्जीवन योजना सुरु करण्यास शासन मान्यता देत आहे. सदर पुनरुज्जीवन योजना ही दोन टप्प्यात राबविण्यात येईल. टप्पा-१ अंतर्गत अस्तित्वातील ग्रामीण प्रादेशिक पाणी पुरवठा व्यवस्थेमध्ये प्राथमिक सुधारणा करणे आणि त्या आधारे टप्पा-२ मध्ये योजनेचे पुनरुज्जीवन करुन पाणी पुरवठा व्यवस्था स्थापित करणे आवश्यक

राहील. पुनरुज्जीवन योजनेच्या अंतर्गत टप्पा-१ अंतर्गत करावयाच्या प्राथमिक सुधारणाचा खर्च हा राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमाच्या (NRDWP) शाश्वती (Sustainability) अंतर्गत करण्यात यावा.

२. बंद पडलेल्या ग्रामीण प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजना पुनरुज्जीवीत करण्यासाठी टप्पा-१ अंतर्गत प्राथमिक सुधारणा आणि त्या आधारे टप्पा-२ मध्ये योजनेचे पुनरुज्जीवन करण्यासाठी खालील कार्य पध्दती राहील.

**अ. टप्पा १ अंतर्गत प्राथमिक सुधारणा:-** अस्तित्वातील बंद ग्रामीण प्रादेशिक पाणी पुरवठा व्यवस्थेचा अभ्यास, योजना बंद असण्याची कारणे, योजनेची उपयोगात येवू शकणारी उपांगे, गावाची लोकसंख्या, पाण्याची सद्याची / भविष्यातील मागणी, इत्यादींचा आढावा घेवून बंद पडलेल्या योजनेचे पुनरुज्जीवन करण्याचा आराखडा तयार करण्यासाठी अस्तित्वातील पाणी पुरवठा व्यवस्थेमध्ये प्राथमिक सुधारणांची कामे टप्पा-१ मध्ये घेण्यात यावी. त्यामध्ये ग्राहक सर्वेक्षण, पाणी लेखापरीक्षण, उर्जा लेखापरीक्षण, जीआयएस मॅपिंग, हायड्रॉलिक मॉडेलिंग, बल्क मिटर्स बसविणे, संगणकीय बिलिंग व वसूली पध्दती इत्यादी बाबींचा समावेश राहील. त्या अनुषंगाने सोबतच्या जोडपत्र- अ नुसार पाणी पुरवठा सुधारण्याची कामे टप्पा-१ अंतर्गत घेण्यात यावीत. वरील प्राथमिक सुधारण्याची कामे करण्यासाठी १००% अनुदान अनुज्ञेय राहील.

**ब. वित्तीय सुधारणांची कामे:-** स्थानिक स्वराज्य संस्थेने पाणी पुरवठा व स्वच्छतेसाठी स्वतंत्र अंदाजपत्रक तयार करावेत तसेच स्वतंत्र लेखे ठेवावेत. प्राथमिक सुधारणांतर्गत अवैध नळ जोडण्या नियमित करून संगणकीकृत बिलींग व वसूली व्यवस्था स्थापित करावी.

बंद ग्रामीण प्रादेशिक पाणी पुरवठा योजनांमध्ये टप्पा-१ अंतर्गत संयुक्त समिती/ जिल्हा परिषदांच्या प्राथमिक सुधारणांच्या (Reforms) प्रस्तावांना कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद यांनी तर महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडील योजनांच्या प्रस्तावांना कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी तांत्रिक मंजूरी देवून प्रचलित कार्यपध्दतीनुसार प्रशासकीय मान्यता दिल्यानंतर संबंधित संस्थेस अनुज्ञेय अनुदानाच्या ५०% अनुदानाचा हप्ता वितरीत करावा. पहिल्या हप्त्यापैकी ८०% रक्कम खर्च झाल्याचे उपयोगिता प्रमाणपत्र प्राप्त झाल्यावर उर्वरीत ५०% अनुदानाचा दुसरा हप्ता वितरीत करावा.

३. टप्पा-१ अंतर्गत प्राथमिक सुधारणा अहवालाच्या आधारे बंद ग्रामीण प्रादेशिक पाणी पुरवठा योजनांचे टप्पा-२ अंतर्गत पुनरुज्जीवन करण्यासाठी खालील कामांना अनुदान अनुज्ञेय राहील :

(१) स्रोत कमी पडत असल्याने स्त्रोताचे बळकटीकरण करणे किंवा नवीन स्त्रोत घेणे.

(२) योजनेची मुख्य जलवाहिनी निकामी ठरल्याने किंवा मोडकळीस आल्याने, त्याची दुरुस्ती किंवा ती बदलणे.

(३) योजनेची पंपींग मशिनरी नादुरुस्त असल्यास तिची दुरुस्ती वा अपवादात्मक परिस्थितीत ती बदलणे.

(४) योजनेचे जलशुद्धीकरण केंद्र नादुरुस्त असल्याने, ते दुरुस्त करणे किंवा त्यातील उपांगे बदलणे.

(५) योजनेची वितरण व्यवस्था कुचकामी ठरलेली असल्याने ती दुरुस्त करणे किंवा आवश्यक तेवढा भाग बदलणे.

(६) योजनांची साठवण टाकी / ब्रेक प्रेशर टँक यांची दुरुस्ती.

(७) योजनांमधील अनेक गावे बाहेर पडल्याने, उर्वरित गावांवर येणारा योजनेच्या कार्यान्वयनाचा ताण कमी करण्यासाठी योजनेमध्ये तांत्रिक बदल करणे.

४. वरीलपैकी कारणे विचारात घेऊन, निश्चित कोणत्या उपाययोजना सदर प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजना कार्यान्वित करण्यासाठी अंमलात आणाव्या लागतील, याचा अभ्यास टप्पा १ अंतर्गत प्राथमिक सुधारणा मध्ये संबंधित यंत्रणांनी ( संयुक्त समिती / जिल्हा परिषद/ महाराष्ट्र जीवन प्राधिकरण) करावा. त्याअनुषंगाने टप्पा - २ अंतर्गत पुनरुज्जीवन प्रस्ताव तयार करतांना खालील मुद्यांच्या आधारे मूल्यमापन करण्यात यावे.

(१) योजना कार्यान्वित होऊन किती कालावधी झालेला आहे. तसेच दुरुस्तीसाठी वेळोवेळी किती खर्च करण्यात आला आहे.

(२) योजनेतील ज्या उपांगांची दुरुस्ती / बदल करावयाचा आहे, अशी उपांगे वगळता उर्वरित व्यवस्था पुढील किमान १० वर्षासाठी तरी उपयोगी ठरणार आहे.

(३) योजना पुन्हा कार्यान्वित करण्याची संबंधित ग्रामपंचायतीची मानसिकता आहे.

(४) योजनेतून बाहेर पडलेली गावे विचारात घेता, योजना उर्वरित गावांसाठी परवडणारी ठरणार आहे.

(५) योजना कार्यान्वित केल्यावर त्यातून संबंधित गावे वर्षभर पाणी घेणार आहेत.

(६) जर योजना हस्तांतरीत झालेली नसेल तर, ती पुनरुज्जीवनानंतर, संबंधित संयुक्त समिती / जिल्हा परिषद हस्तांतरीत करून घेण्यास तयार आहे. तसेच पाण्याचा दर आकारणी, वसूली, प्रभावी देखभाल व दुरुस्ती कशा पध्दतीने करण्यात येणार आहे.

५. वरीलप्रमाणे मूल्यमापन झाल्यानंतर, ज्या बंद पडलेल्या ग्रामीण प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजनांचे टप्पा-२ अंतर्गत पुनरुज्जीवन करून त्या कार्यान्वित करणे व्यवहार्य आहे, अशा योजनांना पुनरुज्जीवित करण्याचे सविस्तर प्रकल्प प्रस्ताव तयार करून त्यांना दि.१७ मार्च, २०१० च्या शासन निर्णयातील परिच्छेद २ मधील तरतुदीनुसार तांत्रिक मान्यता देण्यात यावी. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०१००३१७१५३८२१००१ असा आहे. बंद पडलेल्या ज्या ग्रामीण प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजनांचे पुनरुज्जीवन करावयाचे आहे त्यांचा समावेश राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमाच्या (NRDWP) कृती आराखडयामध्ये समावेश करावा. बंद पडलेल्या ग्रामीण प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजनांच्या टप्पा-२ अंतर्गत पुनरुज्जीवनाचा खर्च हा राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमातून (NRDWP) (Coverage) व्याप्ती अंतर्गत करण्यात यावा.

६. बंद पडलेल्या ग्रामीण प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजनांचे टप्पा २ अंतर्गत पुनरुज्जीवन करण्यासाठी ग्राम पंचायतीची संयुक्त समिती / जिल्हा परिषदेचे प्रस्ताव हे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांचेमार्फत, तर महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून चालविण्यात येत असलेल्या योजनांचे प्रस्ताव, सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचेमार्फत शासनास सादर करण्यात यावेत. सदर प्रस्तावांना मंजूरी देण्यासाठी खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात येत आहे :

| | |
|---|---|
| (१) प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग | अध्यक्ष |
| (२) सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,मुंबई | सदस्य |

(३) सह सचिव / उप सचिव (पापु-०७) सदस्य

(४) संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा सदस्य

(५) संचालक, पाणी, स्वच्छता व सहाय्य संस्था सदस्य

(६) मुख्य अभियंता तथा विशेष कार्य अधिकारी, पापुवस्ववि सदस्य

(७) अवर सचिव (पापु-०७) सदस्य सचिव

७. या समितीची कार्यकक्षा खालीलप्रमाणे राहील :

(१) जिल्हा परिषद / महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून प्राप्त झालेल्या प्रस्तावांची तांत्रिक, आर्थिक व व्यवस्थापकीय व्यवहार्यता तपासून मान्यता देणे.

(२) बंद पडलेल्या ग्रामीण प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजनांचे पुनरुज्जीवन सार्वजनिक खाजगी सहभागातून (PPP) करण्यासाठी, अशा योजनांचे मुल्यमापन करण्यासाठी सल्लागारांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. अशा प्रस्तावांची तांत्रिक, आर्थिक, व्यवस्थापकीय दृष्ट्या तपासणी करून सदर योजनेसाठी वर्धनक्षमता अनुदानाच्या प्रमाणाबाबत (Viability Funding) निर्णय घेणे.

(३) बंद पडलेल्या योजनांचे पुनरुज्जीवन विविध विकल्पांच्या आधारे करण्यासाठी शक्यता पडताळणे व त्यानुसार निर्णय घेणे.

(४) बंद पडलेल्या योजना तसेच पुनरुज्जीवनासाठी मंजूर केलेल्या प्रकल्पांचा वेळोवेळी आढावा घेऊन, पुढील रुपरेषेबाबत शिफारस करणे.

८. समितीने प्रस्तावाला मंजूरी दिल्यानंतर, रु.३.०० कोटींपर्यंतच्या प्रस्तावांना जिल्हा परिषदेकडून प्रशासकीय मान्यता देण्यात येईल, तर रु.३.०० कोटींपेक्षा जास्त किमतीच्या प्रस्तावांना शासनाकडून प्रशासकीय मान्यता देण्यात येईल.

९. बंद पडलेल्या ग्रामीण प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजनांचे पुनरुज्जीवित केल्यानंतर ती हंगामी स्वरुपात न चालविता नियमित चालविण्यात यावी.

१०. प्रस्तावांना तांत्रिक मान्यता देण्यापुर्वी, योजनेमध्ये सहभागी असलेल्या गावांची संयुक्त समिती तयार करण्यात यावी. प्रत्येक ग्रामसभेकडून सदर योजनेत सहभागी होणे, लोकवर्गणी अदा करणे, त्याचप्रमाणे योजना कार्यान्वित झाल्यावर ती संयुक्त समितीच्या माध्यमातून ताब्यात घेण्यास तयार असल्याबाबतचे ठराव करून घेण्यात यावेत. शिखर समितीचे राष्ट्रीयकृत बँकेमध्ये बचत खाते सुरु करण्यात यावे.

११. योजनेसाठी शासन अनुदान वितरीत करण्याची व लोकसहभागाची रक्कम भरण्याची कार्यपद्धती शासन शुद्धिपत्रक क्र.ग्रापाधो-११०९/ प्र.क्र.१०४ (अ)/ पापु-०७ ,दि.३१ जानेवारी, २०११ मध्ये नमूद केल्याप्रमाणे राहील. सदर शासन शुद्धिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध असून त्याचा संगणक संकेतांक २०११०१३११६१०५९००१ असा आहे.

१२. संयुक्त समिती / जिल्हा परिषदेकडून राबविण्यात येणा-या पुनरुज्जीवित योजनांच्या भौतिक व आर्थिक प्रगतीचे सनियंत्रण करण्याची जबाबदारी, संचालक, पाणी, स्वच्छता व सहाय्य संस्था यांची राहील. तर, महाराष्ट्र

जीवन प्राधिकरणामार्फत राबविण्यात येणा-या योजनांच्या भौतिक व आर्थिक प्रगतीचे सनियंत्रण करण्याची जबाबदारी, सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांची राहील. त्यानुसार, शासनास मासिक अहवाल सादर करण्यात यावा.

१३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेब साईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक २०१२०७१६१५५३४३१८०० असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(शैला ए.)
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रत,

१) मा.मुख्यमंत्री, यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
२) मा.मंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव,
३) मा.राज्यमंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव
४) मा.विधीमंडळ सदस्य (सर्व)
५) प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई.
६) सचिव, ग्राम विकास व पंचायत राज, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई.
७) सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई
८) संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे
९) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
१०) संचालक, पाणी स्वच्छता व सहाय्य संस्था (WSSO), नवी मुंबई
११) सर्व मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण
१२) सर्व प्रादेशिक उपसंचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा
१३) सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी,
१४) सर्व अधिक्षक अभियंता (ग्रामीण व नागरी), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण
१५) अधिक्षक अभियंता, राज्यस्तरीय भारत निर्माण कक्ष, नवी मुंबई
१६) सर्व कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद
१७) महालेखापाल, महाराष्ट्र -१ मुंबई (लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता)
१८) महालेखापाल, महाराष्ट्र -२ नागपूर (लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता)
१९) महालेखाकार (स्थानिक निकाय लेखापरिक्षा व लेखा), मुंबई.
२०) मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा,नवी मुंबई
२१) उप मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा,नाशिक, पुणे,औरंगाबाद, अमरावती व नागपूर
२२) सर्व जिल्हा वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा
२३) सर्व कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकर
२४) नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
२५) वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
२६) मंत्रालयातील इतर सर्व विभाग,
२७) पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील सर्व पर्यवेक्षीय अधिकारी व कार्यासने
२८) निवडनस्ती, कार्यासन क्रमांक पापु-०७

## प्राथमिक सुधारणा टप्पा-१ मध्ये पूर्ण करावयाची कामे

### जोडपत्र - अ

(शासन निर्णय क्रमांक ग्रापाधो-११११/प्र.क्र.००७(ब)/पापु-०७ मंत्रालय, मुंबई-४०० ०३२ दिनांक : जुलै, २०१२)

| अ.क्र | प्राथमिक सुधारणा | संनियंत्र आणि मुल्यांकनासाठी कामगिरी निर्देशांक |
|---|---|---|
| १ | ग्राहक सर्वेक्षण | • १०० टक्के घरांचे सर्वेक्षण करणे.<br>१.अनधिकृत नळ जोडण्यांची संख्या निश्चित करुन त्यांचे अधिकृत नळजोडणीत रुपांतर करणे<br>२.सर्व सार्वजनिक नळ जोडण्याचे रुपांतर गट/वेयक्तिक नळ जोडणीत रुपांतर करणे<br>३.प्रत्येक घराबाबत संगणकीय डेटा तयार करणे व तो अद्यावत ठेवणे. |
| २. | ग्राहक तक्रार निवारण पध्दत स्थापित करणे | • ग्राहक तक्रार निवारण पध्दत स्थापित करणे |
| ३. | सर्व औद्योगिक व वाणिज्यक ग्राहकांना मीटर बसविणे | • १०० टक्के औद्योगिक व वाणिज्यिक ग्राहकांना मीटर बसविणे(Bulk Metering)<br>• पाणी पुरवठा व्यवस्थेवर बल्क मिटर्स बसविणे. |
| ५ | जी.आय.एस.मॅपींग | • पाणी पुरवठा योजनांच्या वितरण व्यवस्थेतबाबत (net work) माहिती जी.आय.एस वर संकलित करणे. |
| ६ | पाणी व ऊर्जा लेखापरिक्षण | • पाणी लेखापरिक्षण पूर्ण करणे.<br>• पाणी गळतीचे प्रमाण (NRW) निश्चित करणे.<br>• योजनेच्या पुनर्वसनासाठी सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) तयार करणे.<br>• योजनेचे उर्जा लेखापरीक्षण करणे व पुनर्वसनासाठी कामे निश्चित करणे. |
| ७ | वित्तीय व्यवस्थापन | • संगणकीय देयके वाटपाची पध्दत स्थापित करणे.<br>• १०० टक्के देयके वाटप करणे व किमान ८० टक्के वसुली करणे.<br>• देखभाल दुरुस्ती खर्चाची ८०-९० टक्के वसुली साध्य करणे<br>• पाणीपट्टी दर सुधारित करणे. |
| ९ | सांडपाणी /दुषित पाण्याच्या स्त्रोताचे नियोजन | • दुषित असलेल्या सर्व स्त्रोताची संख्या निश्चित करणे.<br>• सांडपाणी/ घनकचरा व्यवस्थापनासाठी गाव स्वच्छता आराखडा तयार करणे (Village Sanitation Plan) |

-----